हर्षवर्धन दुसऱ्यांदा ‘महाराष्ट्र केसरी’

अंतिम लढतीत महेंद्र गायकवाडवर ४-३ अशी मात

लोकसत्ता क्रीडा प्रतिनिधी

पुणे : सात वर्षांनी नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने दुसऱ्या ‘महाराष्ट्र केसरी’चा प्रतिष्ठेचा किताब दुसऱ्यांदा पटकावला. अंतिम लढतीत हर्षवर्धन याने आपला गुरुबंधू महेंद्र गायकवाड याला गुणांवर ४-३ असे पराभूत करून ६८वा ‘महाराष्ट्र केसरी’ किताब मिळवला.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आणि रामकृष्ण सातव कर्तव्य फाउंडेशनच्या वतीने वाघोली येथे आयोजित केलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या किताबी लढतीसाठी दिवंगत अजित पवार क्रीडानगरी तुडुंब भरली होती. गादी आणि माती विभागातील आपापल्या अंतिम लढती सहज जिंकून महेंद्र आणि हर्षवर्धन यांनी किताबी लढतीसाठी स्वतःची पात्रता सिद्ध केली होती. जन्माने दोघेही वेगवेगळ्या जिल्ह्यातील असले, तरी सरावासाठी दोघेही पुण्यात अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार यांच्याकडे आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलात मार्गदर्शन घेतात. हर्षवर्धनने यापूर्वी २०१९-२० मध्ये शैलेश शेळके याच्यावर मात करुन एकदा हा किताब पटकावला होता. महेंद्रने दुसऱ्यांदा किताबी लढतीत प्रवेश केला. यापूर्वी २०२२-२३ मध्ये झालेल्या किताबी लढतीत महेंद्रला शिवराज राक्षेकडून पराभव पत्करावा लागला होता.

किताबाच्या अंतिम लढतीसाठी गुरुबंधूमध्ये एक तगडी स्पर्धा अपेक्षित होती. मात्र, आक्रमक होत असलेल्या अंतिम कुस्तीत अनेकदा महेंद्रच्या अखिलाडूवृत्तीने व्यत्यय येत राहिला. महेंद्र सातत्याने हर्षवर्धनच्या चेहऱ्यावर हात मारत होता. यामुळे पूर्वार्धात याचा दंड म्हणून प्रतिस्पर्धी हर्षवर्धनला एक गुण देण्यात आला होता. मात्र, उत्तरार्धात एका क्षणी हर्षवर्धन ४-१ असा आघाडीवर असताना महेंद्र त्याच्या अंगावर देखिल धावून आला. मात्र, पंचांनी पुन्हा एकदा महेंद्रला कडक समज देऊन पुन्हा कुस्ती सुरू केली. त्यानंतर महेंद्रने दोनवेळा हर्षवर्धनला संरक्षक क्षेत्रातून बाहेर नेत दोन गुणांची कमाई केली. पण, तोवर कुस्तीची वेळ संपली होती. दोन्ही मल्लांनी केलेल्या डाव प्रतिडावामुळे उत्तरार्धात कुस्ती रंगणार असे वाटत होते. मात्र, हर्षवर्धनने आपला बचाव भक्कम ठेवत महेंद्रला वर्चस्व राखून दिले नाही.

त्यापूर्वी, बाहुबली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महेंद्र गायकवाड याने माती विभागातील अंतिम लढतीत सर्वाधिक लोकप्रिय असलेला आणि किताबासाठी पहिली पसंती असलेल्या सिकंदर शेखचा गुणांवर ३-० असा पराभव करुन दुसऱ्यांदा किताबी लढतीसाठी पात्रता सिद्ध केली. पाठोपाठ झालेल्या गादी विभागातील अंतिम लढतीत माजी विजेत्या हर्षवर्धन सदगीर याने सोलापूरच्या जय पाटील याची स्वप्नवत घोडदौड पहिल्याच तीन मिनिटांच्या फेरीत अवघ्या दीड मिनिटांत तांत्रिक गुणांच्या वर्चस्वावर रोखली. आक्रमक सुरुवात करुन ताबा मिळविण्यावर सातत्याने भारदांज डावाचा वापर करुन त्याने दहा गुणांची कमाई करत पुन्हा एकदा किताबी लढतीत प्रवेश केला.

गर्दी टाळण्यासाठी आगळा निर्णय

‘महाराष्ट्र केसरी’ किताबाच्या लढतीत मल्लांच्या पाठिराख्यांची आणि प्रमुख पाहुण्यांची होणारी गर्दी कायम चर्चेचा विषय ठरते. मात्र, या वेळी महाराष्ट्र कुस्तीगीर संघाने यावर तोडगा काढताना अंतिम लढतीची सलामी आणि गदा प्रदान सोहळा असे दोन्ही कार्यक्रम प्रमुख पाहुण्यांसह व्यासपीठावरच घेतले. मात्र, प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त गर्दीमुळे दोन्ही मल्लांना मॅटवर येण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली.

तिसऱ्या स्थानासाठी पंतला पसंती

कारकीर्दीला नव्याने आकार देण्याचे कठीण आव्हान

नवी दिल्ली : यष्टिरक्षक फलंदाज म्हणून कारकीर्द पणाला लागलेल्या ऋषभ पंतकडून अपेक्षा वाढल्या असून, इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) नव्या हंगामात तो लखनऊ सुपर जायंट्सकडून तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येईल, असे फ्रँचायझीकडून सांगण्यात आले.

गेल्या वर्षातील निराशाजनक कामगिरीनंतर पंतने ट्वेन्टी-२० क्रिकेट संघातील स्थान गमावले होते. आता नव्याने कारकीर्दीला आकार देण्यासाठी सज्ज असलेल्या पंतला आता नेतृत्व आणि फलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर स्वतःला सिद्ध करावे लागणार आहे. सध्या पंत केवळ कसोटी संघातून खेळत आहे. एकदिवसीय सामन्यांत केएल राहुल यष्टिरक्षकाच्या भूमिकेत दिसतो, तर ट्वेन्टी-२० संघात संजू सॅमसन आणि इशान किशन यांनी पंतसमोर कडवे आव्हान उभे केले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर पंतला पुनरागमनासाठी ‘आयपीएल’च्या नव्या हंगामात काहीतरी विशेष करून दाखवावे लागेल. त्यामुळे ही स्पर्धा केवळ त्याच्या किमतीला न्याय देण्यापुरती नसून, ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठीही महत्त्वाची ठरणार आहे.

गेल्या हंगामात पंतने बहुतेक वेळा चौथ्या क्रमांकावर फलंदाजी केली होती, परंतु हंगामाच्या शेवटी त्याने तिसऱ्या क्रमांकावर खेळण्याचा निर्णय घेतला. मात्र, तोपर्यंत लखनऊसाठी खूप उशीर झाला होता. आता पंतला जागा करून देण्यासाठी निकोलस पूरन खालच्या क्रमांकावर फलंदाजी करेल, तर चार, पाच आणि सहा हे क्रमांक परिस्थितीनुसार बदलले जातील.

लखनऊ संघ चेन्नईतील सराव शिबीर संपवून १ एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध होणाऱ्या पहिल्या सामन्यासाठी लखनऊमध्ये सराव करत आहेत. मुख्य प्रशिक्षक जॅस्टिन लँगर आणि पंत यांचे फलंदाजीच्या क्रमाबाबत एकमत झाले आहे.

AU SMALL FINANCE BANK

नोंदणीकृत कार्यालय : १९-ए धुळेश्वर गार्डन, जयपूर, राजस्थान – ३०२००१, भारत.
www.au.bank.in

सोन्याच्या दागिन्यांच्या अनुसार कर्ज – लिलाव सूचना "जसे आहे जेथे आहे" या आधारे

याखाली नमूद केलेल्या ऋणकोंकरिता **एयू स्मॉल फायनान्स बँक लि.**कडून ("**बँक**") लाभ घेतलेल्या सोन्याच्या दागिन्यांवरील कर्ज सुविधांच्या अनुसार त्यांच्या थकित देणी रकमेचे प्रदान करण्यास सूचना निर्गमित केल्या आहेत. ऋणको त्याच्या / त्यांच्या देणींची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने, आम्हास त्यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रणालीत वर नमूद केलेल्या शाखांकडे २२ एप्रिल २०२६ रोजी स. ११.०० व दु. ०३.०० दरम्यान (वेळ) तारणगहाण असलेल्या सोन्याचे आयटम्स / आर्टिकल्सच्या लिलावाचे आयोजन करण्यास भाग पडले आहे. दिवंगत ऋणकोंच्या बाबतीत, कायदेशीर वारसदारांना सर्व अटी लागू असणार आहेत. **कृपया नोंद घ्यावी की, वरील लिलाव अयशस्वी ठरल्यास, "बँक" कोणतीही पूर्व–सूचना न देता दुसऱ्या लिलावाचे आयोजन करण्यास तिचा हक्क राखून ठेवीत आहे.**

प्रत्यक्ष लिलाव शाखा तपशील

पणजी–गोवा – २५६६०००१७५३१५१

नोंद : १. प्रत्यक्ष लिलावाचे आयोजन अयशस्वी ठरल्यास, https://gold.samil.in या वेबलिंकचा वापर करून ई–लिलावाचे आयोजन करण्यात येईल.
२. कृपया ही सूचना, जर प्रस्तावित लिलाव अयशस्वी ठरल्यास, पुढील लिलावाकरिता पूर्व–सूचना म्हणून समजण्यात यावी.
३. लिलावाचे आयोजन बोलीप्रपत्रातील निश्चित शर्ती व अटींच्या विषयाधीन आहे, ज्याची लिलाव सुरू होण्यापूर्वी उपलब्ध करून देण्यात येईल.

स्वाक्षरी/–
व्यवस्थापक
एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

नाकामुराकडूनही ‘कँडिडेट्स’ स्पर्धेच्या परिस्थितीबाबत चिंता व्यक्त

नवी दिल्ली : पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीपाठोपाठ आता ग्रँडमास्टर आणि जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या हिकारू नाकामुराने सायप्रसमध्ये प्रस्तावित ‘कँडिडेट्स’ स्पर्धेच्या आयोजनाबाबत चिंता व्यक्त केली आहे.

नाकामुरा तयारीसाठी जवळपास गेल्या दोन महिन्यांपासून सायप्रसमध्ये ठाण मांडून आहे. या दोन महिन्यांतील अनुभवानंतर नाकामुराने स्पर्धेच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. सायप्रसमध्ये काही भागांमध्ये वीज पूर्णपणे जाते आणि दीर्घकाळ परत येत नाही, हे चांगले लक्षण नाही, असे नाकामुराने ‘एक्स’वर म्हटले आहे. लेबनॉनमधून सोडण्यात आलेल्या ड्रोनने बेटावरील ब्रिटिश हवाई दलाच्या तळावर हल्ला करण्यात आला, तेव्हाच सायप्रसमध्ये ही स्पर्धा खेळविण्यात धोका असल्याचे स्पष्ट झाले होते. हल्ला करण्यात आलेले ठिकाण स्पर्धा होणार असलेल्या ‘कॅप सेंट जॉर्ज हॉटेल अँड रिसॉर्ट’पासून ८५ किमी पूर्वेला आहे.

सायप्रसमधील खेळाच्या परिस्थितीबद्दल यापूर्वी भारतीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीनेही तेथील परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली होती. ‘‘पश्चिम आशियात सध्या सुरू असलेल्या युद्धात सक्रियपणे सहभागी असलेल्या लेबनॉन आणि इस्रायलसारख्या राष्ट्रांपासून फार दूर नसलेल्या देशात स्पर्धा खेळण्याचा धोका पत्करण्याची इच्छा नाही,’’ असे हम्पी म्हणाली होती.

काही दिवसांपूर्वीच, एका जर्मन अब्जाधीश रोझेनस्टीनने आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघास (फिडे) ही स्पर्धा जर्मनीत स्थानांतरित करण्याचा पर्याय सुचवला होता. अर्थात, याला ‘फिडे’ने अजून प्रतिसाद दिलेला नाही.

MANAPPURAM HOME

मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
आधीचे मणप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.
सीआयएन: यू६५९२३केर२०१०पीआयसी०३९१७९,
नोंदणीकृत कार्यालय: ८/५९६ अ, पद्मप्रभा बिल्डिंग, श्रीराम स्वामी मंदिराजवळ, चेरपू–त्रिप्रयार रोड, त्रिप्रयार, त्रिशूर, केरळ – ६८०५६७
फोन नं.: ०४८७– ३५२०५०४, **वेबसाइट:** www.manappuramhomefin.com

डिमांड नोटीस

ज्याअर्थी मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, आमचे नोंदणीकृत कार्यालय ८/५९६ अ, पद्मप्रभा बिल्डिंग, श्रीराम स्वामी मंदिराजवळ, चेरपू–त्रिप्रयार रोड, त्रिप्रयार, त्रिशूर, केरळ– ६८०५६७ आणि भारतातील विविध ठिकाणी शाखा आहेत (यापुढे ‘‘एमएचओएफआयएन’’ म्हणून संदर्भित) कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी आणि वित्तीय संस्था आहे, सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम २ च्या उप–कलम (१) च्या खंड (एम) च्या उप–खंड (४) च्या अर्थामध्ये (यापुढे कायदा म्हणून संदर्भित) सहवाचता अधिसूचना क्र. एस. ओ. ३४६६ (ई) दिनांकित १८ डिसेंबर २०१५ रोजी भारत सरकार, वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली यांनी जारी केलेले, इतर गोष्टींबरोबरच बांधकाम आणि/ किंवा निवासस्थानांच्या खरेदीसाठी कर्ज देण्याच्या व्यवसायात आणि खाली नमूद केलेल्या तक्त्याच्या रकाना क्र. २ मध्ये नमूद केल्यानुसार कर्जदार/ सह–कर्जदारांनी एमएचओएफआयएन यांच्याकडून कर्ज मिळवले आहे आणि एमएचओएफआयएन हे सरफेसी कायद्यांतर्गत सुरक्षित धनको असताना आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम २००२ च्या नियम २ सह वाचलेल्या या कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/ सह–कर्जदारांना नोटिसमध्ये नमूद केलेली रक्कम त्यावरील पुढील व्याजासह नोटिसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करणारी मागणी नोटीस जारी केली, परंतु त्यापैकी काहींना विविध कारणांमुळे नोटिसा बजावल्या जाऊ शकल्या नाहीत. त्या व्यतिरिक्त खाली दिलेल्या कर्जदारांच्या माहितीच्या उद्देशाने, या जाहीर सूचनेद्वारे सांगितलेल्या कर्जदारांना कळवले जात आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे/ सह–कर्जदाराचे नाव/ एलएएन/ शाखा	सुरक्षित मालमत्तेचे वर्णन ज्याच्या संदर्भात स्वारस्य तयार केले आहे	एनपीए तारीख	नोटीस पाठवण्याची तारीख आणि थकबाकीची रक्कम
१	मुकीम सरदार पटेल, सबियाबी मुकीम शिखर, हैदर बुरहान शेख,/ **एनएलएपी००३२०२२०२४/** औरंगाबाद	मालमत्ता ग्रामपंचायत मालमत्ता मिळकत क्र. ४३०/३ येथे बोरगाव सरवणी, ता. सिल्लोड जि. औरंगाबाद, मोजमापे क्षेत्रफळ ५४४.५० चौ.फू येथे स्थित बोरगाव सरवणी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र, पिन: ४३१११३ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, पूर्व– खुर्शीदबी शब्बीर यांचे मिळकत, पश्चिम– शेख बुधन यांचे घर, दक्षिण– शासकीय रस्ता, उत्तर–स्वतःचे घर.	१३.०२.२०२६	दि. १६.०२.२०२६ आणि रु.५०५८२९/–

म्हणून, वर नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना/ सह–कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये त्यांना सदर ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ६० दिवसांच्या आत संबंधित कर्जदार/ सह–कर्जदाराविरुद्ध येथे दर्शविल्याप्रमाणे एकूण थकबाकीची रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. संबंधित कर्जदार/ सह–कर्जदाराने एकूण थकबाकीची रक्कम आणि पुढील व्याज भरण्यात अयशस्वी झाल्यास, एमएचओएफआयएन वर वर्णन केल्याप्रमाणे मालमत्तेवरील सिक्युरिटी इंटरेस्टची अंमलबजावणी करण्यासाठी कलम १३(४) अंतर्गत पाऊले उचलण्यास भाग पाडले जाईल. कायदा आणि येथे केलेल्या नियमांनुसार विहित केलेल्या इतर पद्धतीने नोटिसची सेवा देण्यासाठी देखील पाऊले उचलली जात आहेत. तुम्हाला सूचना देण्यात येते की, सरफेसी कायद्याच्या कलम १३(८) यामध्ये तपशीलवार वर्णन केल्यानुसार, जाहीर लिलावासाठी किंवा विक्रीच्या मार्गाने हस्तांतरणासाठी खासगी करारासाठी सूचना प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कधीही एमएचओएफआयएन यांनी यांच्याद्वारे केलेले खर्च, शुल्क आणि किंमतीसहित संपूर्ण देय रक्कम भरल्यानंतर सांगितलेल्या तारणाची पूर्तता केली जाऊ शकते.
लक्षात घ्या की, सरफेसी कायद्याच्या कलम एस– १३(१३) यानुसार, तुम्हाला याद्वारे सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतरण आणि/ किंवा विक्री, भाडेपट्ट्याने किंवा इतर कोणत्याही पद्धतीने कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्यापासून प्रतिबंधित केले आहे.

दिनांक: २३ मार्च २०२६ | **ठिकाण:** महाराष्ट्र
सही/– अधिकृत अधिकारी, मणप्पुरम होम फायनान्स लि.

---

pnb Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय : ९ वा मजला, अंत्रिक्श भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली–११०००१.
फोन्स : ०११–२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com
शाखा कार्यालय खराडी : तिसरा मजला, गणलक्ष्मी कॉम्प्लेक्स, सर्व्हे नं. ०८, हडपसार खराडी बायपास रोड, खराडी, पुणे–४११०१४, महाराष्ट्र.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अंतर्गत आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या रुल ८(१)च्या अनुपालनार्थ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनांच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केल्यानुसार रकमेची परतफेड करण्याकरिता संबंधित ऋणकोंवर फर्मावणारी प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखे दिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणकोंना आणि आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी प्रत्येक अकाऊंटच्या अनुसार नमूद केलेल्या तारखां दिवशी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरून ऋणकोंना तसेच आमजनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी उक्त मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि उक्त मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार कर्ज करारनाम्याच्या अनुसार रक्कम व त्यावरील व्याज या रकमेकरिता "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब–सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.

लोन अकाऊंट नं.	ऋणको / सह–ऋणको / हमीदाराचे नाव	मागणी सूचना तारीख	थकित रक्कम	ताबा घेतल्याची तारीख	गहाणवट मालमत्तेचे वर्णन
HOU/NSK/ 0820/808110 शाखा कार्यालय : खराडी	**योगेश ज्ञानेश्वर मोरे / सवीता योगेश मोरे**	२५.०८.२०२३	**रु. ३८,०६,०९४.०२/–** **(रुपये अडतीस लाख सहा हजार चौऱ्याण्णव व पैसे दोन फक्त)**	१८.०३.२०२६ (प्रत्यक्ष)	फ्लॅट नं. ४, ४था मजला, प्लॉट नं. ०९, सर्व्हे नं. २३३ / बी / ९, गुरु सेवा हाईट्स, कलानगर, दिंडोरी रोड, नाशिक – ४२२००४, महाराष्ट्र.

स्थळ : नाशिक
दिनांक : २३.०३.२०२६
प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.

---

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

नोंदणीकृत कार्यालय: ९वा मजला, अंत्रिक्श भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली– ११०००१.
फोन्स: ०११–२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट: www.pnbhousing.com
शाखा कार्यालय नाशिक: ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मशिल्प लँडमार्क, तनिष्क शोरूमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राका कॉलनी शरणपूर रोड, नाशिक– ४२२००२.

तारखेनुसार सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ३(१) यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या चॅप्टर III च्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचना

आम्ही, ‘‘पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड’’ (यापुढे ‘‘पीएनबीएचएफएल’’ म्हणून संदर्भित) सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या चॅप्टर IIIच्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केली होती. उक्त मागणी सूचना हप्ते/ व्याजाचे प्रदान न केल्यामुळे व भारतीय रिझर्व्ह बँक/ नॅशनल हाऊसिंग बँकेच्या मार्गदर्शकसूचनानुसार तुमच्या खात्याचे नॉन–परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकरण केल्यामुळे तुम्हास याखाली नमूद केलेले सर्व ऋणको/ सह–ऋणको/ हमीदारांकरिता आमच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा निर्गमित करण्यात आली होती. त्यातील समाविष्ट मजकुरात मुद्दल रकमेचा हप्ता, व्याज इ. च्या प्रदानामध्ये तुमच्याद्वारा झालेली कसूर दर्शविण्यात आली आहे. आम्हास विश्वास वाटतो की तुम्ही मागणी सूचना स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहात आणि म्हणून या मागणी सूचनेची प्रसिद्धी जी उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गतसुद्धा आवश्यक आहे. तुम्हास याद्वारा या मागणी सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत ‘‘पीएनबीएचएफएल’’ला आतापर्यंतचे व्याज व आकारासह पूर्वोक्त रकमेचे प्रदान करण्यास फर्मावण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास ‘‘पीएनबीएचएफएल’’ ऋणको व हमीदारांच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेऊन समाविष्ट एक किंवा अनेक सुरक्षित मत्तेच्या अनुसार, उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४)च्या कोणत्याही किंवा सर्व तरतुदींअंतर्गत आवश्यक कारवाई सुरू करील. सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३च्या सब–सेक्शन (८)च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधीत आहोत, जेथे त्या अंतर्गत तुम्ही जाहीर किंवा खासगी करारद्वारा निविदा मागवून, दरपत्रके मागवून, जाहीर लिलावाद्वारा सुरक्षित मत्तेच्या विक्रीकरिता सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपर्यंत केवळ ‘‘पीएनबीएचएफएल’’द्वारा निश्चित सर्व किंमत, आकार व खर्चासह एकत्रित थकित देणीची संपूर्ण रक्कम भरू शकता/ प्रदान करू शकता. याअधिक तुम्हास पूर्वोक्त सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरणापासून उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(१३) अंतर्गत प्रतिबंधित करण्यात आले आहे.

लोन अकाऊंट नंबर	ऋणको व सह–ऋणकोचे नाव/ पत्ता	हमीदाराचे नाव व पत्ता	गहाणवट मालमत्ता	मागणी सूचनेची तारीख	मागणी सूचना तारखेनुसार थकित रक्कम
HOU/NSK/ 1221/ 941947 **शाखा कार्यालय: नाशिक**	**श्री. भूषण गोविंदा मिस्तारी (ऋणको) आणि श्री. गोविंदा विठ्ठल मिस्तारी (सह–ऋणको)**/ पत्ता:– ६१०/बी, रविवार पेठ, गंगावाडी, नाशिक– ४२२००१, महाराष्ट्र, भारत. **येथे सुद्धा:** डीएनईजी इंडिया मिडिया सर्व्हिसेस लिमिटेड, पिरॅमल बिझनेस पार्क, महाकाली केव्हज, अंधेरी (पू.), मुंबई– ४०००९३, महाराष्ट्र, भारत. **येथे सुद्धा:** फ्लॅट नं. २०३, दुसरा मजला, प्लॉट नं. ४५, सर्व्हे नं. ८८२/३/४५, साई अपार्टमेंट, राजीवनगर, नाशिक– ४२२००९, महाराष्ट्र.	**उपलब्ध नाही**	फ्लॅट नं. २०३, दुसरा मजला, प्लॉट नं. ४५, सर्व्हे नं. ८८२/३/४५, साई अपार्टमेन्ट, राजीवनगर, नाशिक– ४२२००९, महाराष्ट्र.	१२.०३.२०२६	रु.२२,६२,०१३.१६/–

स्थळ: नाशिक, दिनांक: २३.०३.२०२६
प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.

---

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंत्रिक्श भवन, २२, के.जी. मार्ग, नवी दिल्ली–११०००१.
फोन्स :– ०११–२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com
शाखा कार्यालय औरंगाबाद : ई–१, ई–२ व ई–३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेंटर, अदालत रोड, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र.

तारखेनुसार सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ३(१) यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या चॅप्टर IIIच्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचना

आम्ही, "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" (यापुढे "पीएनबीएचएफएल" म्हणून संदर्भित) सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या चॅप्टर IIIच्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केली होती. उक्त मागणी सूचना हप्ते/व्याजाचे प्रदान न केल्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँक/नॅशनल हाऊसिंग बँकेच्या मार्गदर्शकसूचनानुसार तुमच्या खात्याचे नॉन–परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकरण केल्यामुळे तुम्हास याखाली नमूद केलेले सर्व ऋणको/सह–ऋणको/हमीदारांकरिता आमच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा निर्गमित करण्यात आली होती. त्यातील समाविष्ट मजकुरात मुद्दल रकमेचा हप्ता, व्याज, इ.च्या प्रदानामध्ये तुमच्याद्वारा झालेली कसूर दर्शविण्यात आली आहे. याअधिक, काही कारणास्तव, आम्हास विश्वास वाटतो की तुम्ही मागणी सूचना स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहात आणि म्हणून या मागणी सूचनेची प्रसिद्धी जी उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गतसुद्धा आवश्यक आहे. तुम्हास याद्वारा आतापर्यंतचे व्याज व आकार यासह पूर्वोक्त रकमेचे या मागणी सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत "पीएनबीएचएफएल"ला प्रदान करण्यास फर्मावण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास "पीएनबीएचएफएल" ऋणको व हमीदारांच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेऊन सर्व किंवा कोणत्याही एक किंवा अनेक सुरक्षित मत्तेच्या अनुसार, उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४)च्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदीअंतर्गत आवश्यक कारवाई/उपाययोजना सुरू करील. सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३च्या सब–सेक्शन (८)च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधीत आहोत, जेथे त्या अंतर्गत तुम्ही जाहीर किंवा खासगी करारद्वारा निविदा मागवून, दरपत्रके मागवून, जाहीर लिलावाद्वारा सुरक्षित मत्तेच्या विक्रीकरिता सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपर्यंत केवळ "पीएनबीएचएफएल"द्वारा निश्चित सर्व किंमत, आकार व खर्चासह एकत्रित थकित देणीची संपूर्ण रक्कम भरू शकता / प्रदान करू शकता. याअधिक तुम्हास पूर्वोक्त सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरणापासून उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(१३) अंतर्गत प्रतिबंधित करण्यात आले आहे.

लोन अकाऊंट नंबर	ऋणको व सह–ऋणकोचे नाव / पत्ता	हमीदाराचे नाव व पत्ता	गहाणवट मालमत्ता	मागणी सूचनेची तारीख	मागणी सूचना तारखेनुसार थकीत देणी
HOU/ARN G/0725/ 1408938 **शाखा कार्यालय : औरंगाबाद**	**श्री. शुभम सोमनाथ कारंडे (ऋणको) व श्री. / श्रीमती सुरेखा सोमनाथ कारंडे (सह–ऋणको), पत्ता :–** ४ ११ ४३४, महादेव मंदिराजवळ, जवाहर कॉलनी, औरंगाबाद – ४३१००१, महाराष्ट्र, भारत. **येथेसुद्धा :–** सह्याद्री एन्टरप्रायझेस, गाला नं. ३९, कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केट, जाधववाडी, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र, भारत. **येथेसुद्धा :–** फ्लॅट नं. ४०४, चौथा मजला, ए–विंग, मंगल कलश अपार्टमेंट, गट नं. २६७, मितमीता, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र.	उपलब्ध नाही	फ्लॅट नं. ४०४, चौथा मजला, ए–विंग, मंगल कलश अपार्टमेंट, गट नं. २६७, मितमीता, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र.	०९.०३.२०२६	रु. १९,०१,२०९.५८
HOU/ARNG/ 1021/ 924092 शाखा कार्यालय : औरंगाबाद	**श्री. गोरखनाथ भगवंता घुगे (ऋणको) व श्री. / श्रीमती रामकुवर गोरखनाथ घुगे (सह–ऋणको), पत्ता :–** प्लॉट नं. १३, गट नं. १५० ३, सिद्धेश्वर नगर, चुनाभट्टी एरिआजवळ, अहिल्यादेवी होळकर चौक, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र, भारत. **येथेसुद्धा :–** प्लॉट नं. १८, सर्व्हे नं. १६५ २, हरी सिद्धीनगर, हर्सूल, दत्त मंदिरजवळ, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र, भारत. **येथेसुद्धा :–** फ्लॅट नं. ११, स्टिल्ट दुसरा मजला, साई सिद्धी रेसिडेन्सी, गट नं. १५४/पार्ट, प्लॉट नं. ५, हर्सूल, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र.	उपलब्ध नाही	फ्लॅट नं. ११, स्टिल्ट दुसरा मजला, साई सिद्धी रेसिडेन्सी, गट नं. १५४/पार्ट, प्लॉट नं. ५, हर्सूल, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र.	०९.०३.२०२६	रु. ३०,१६,६५४.०५

स्थळ : औरंगाबाद,
दिनांक : २३.०३.२०२६
प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

क्षेत्रिय कार्यालय दबावग्रस्त अस्ति वसूली शाखा, अमरावती

C/O M.I.D.C. शाखा प्लॉट क्रमांक 39 "सूर्या", फरशी स्टॉप रोड, दस्तूर नगर, अमरावती (महा.), 444606

वाहनांच्या ई-लिलावाची सूचना

याद्वारा सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदारांना आणि जमानतदारांना सूचना देण्यात येत आहे की बँकेने पक्षांनी केलेल्या गहाणखत/कर्ज करारांतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले गहाण असलेले मोटार वाहन परत ताब्यात घेतले/जप्त केले आहे आणि खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसूल करण्यासाठी वाहन "जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "जे काही आहे ते" या आधारावर विकले जाईल. कर्जदार/जमानतदार/वाहन/एकूण देय/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खालीलप्रमाणे आहे-

अनु./ लॉट क्र.	कर्जदार/जमानतदार यांचे नाव आणि पत्ता	20.03.2026 रोजी एकूण देय रक्कम	वाहन निर्माता आणि मॉडेल आरटीओ नोंदणी क्रमांक	ई-लिलावाची तारीख ई लिलावाची वेळ - प्रारंभ वेळ ते समाप्ती वेळ	1. राखीव किंमत 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) 3. बिड वाढीव रक्कम	मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ	ताब्यात घेण्याची स्थिती (रचनात्मक/ वास्तविक)
1	**श्री. राजेंद्रकुमार प्रदीप शेळके** रा. जय भीम नगर, पोस्ट शिवाजी नगर, आंबेडकर वसतिगृहाजवळ, नांदेड-431601	रु. 11,86,185.00 + त्यावरील लागू न झालेले व्याज + इतर शुल्क	BAANKNET संपत्ती आयडी : BARB61422025343 वाहनाचा प्रकार - मोटर कार-NT मॉडेल क्रमांक -ZS ASTOR VTI TECH MT SHARP EX वाहन निर्माता - MG MOTOR INDIA PVT LTD. नोंदणी क्रमांक - MH26CE2016 नोंदणी तारीख - 28.03.2023 चेसिस क्रमांक - MZ7ED1HKJ5H017723 इंजिन क्रमांक - CRGN5290368 रंग - स्पाइस्ड ऑरेंज वापरलेले इंधन - पेट्रोल मालक-श्री. राजेंद्र कुमार प्रदीप शेळके	09/04/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत प्रत्येक वाढीव बोलीवर 18:00:00 नंतर वेळ 5 मिनिटांनी वाढवला जाईल	रु. 7,29,000/- रु. 72,900/- रु. 10,000/-	02/04/2026 रोजी 10:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत	वास्तविक
2	**कै. श्री. नामदेव सायबू सिंगरवाड कायदेशीर वारस-सौ. लक्ष्मी नामदेव सिंगरवाडओएम रुद्र येथे, रो हाउस नं.08, वर्धमान रो हाऊसमधील ए-विंग, कॅनॉल रोड मौजे-वाडी (Bk.)नांदेड-431605**	रु. 5,47,612.00 + त्यावरील लागू न झालेले व्याज + इतर शुल्क	BAANKNET संपत्ती आयडी : BARB61422025349 वाहनाचा प्रकार - RIGID (PASSENGER CAR) मॉडेल क्रमांक - IGNIS ZETA वाहन निर्माता - MARUTI SUZUKI INDIA LTD नोंदणी क्रमांक - MH26BX8528 नोंदणी तारीख - 21.10.2022 चेसिस क्रमांक - MA3NFG81SNJ374411 इंजिन क्रमांक - K12MN4801906 रंग - मोती आर्क्टिक पांढरा वापरलेले इंधन - पेट्रोल मालक - श्री. नामदेव सायाबू शिंगारवाड	28/04/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत प्रत्येक वाढीव बोलीवर 18:00:00 नंतर वेळ 5 मिनिटांनी वाढवला जाईल	रु. 4,00,000/- रु. 40,000/- रु. 10,000/-	22/04/2026 रोजी 10:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत	वास्तविक

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया https://baanknet.com आणि https://www.bankofbaroda.in/e-auction.htm या वेबसाइट लिंकला पहा/भेट द्या. तसेच, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक 9450802051 वर संपर्क साधू शकतात.

दिनांक : 23/03/2026
स्थळ : अमरावती
(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)
अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा

पंजाब नैशनल बैंक भारत सरकार का उपक्रम
pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट अॅक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्त्यामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.१२.२०२५ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे ड) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा - पीएनबी जळगाव (०२२२००)** **कर्जदार -** **१. श्री. राजु रामभाऊ कांबळे** विश्राम गृह नं.१, नेहरु चौक मागे, जय किसन वाडी, जळगाव, ता. जळगाव, जि. जळगाव- ४२५ ००१ **तसेच राहणार** पत्ता - पदमालय रेस्ट हाऊस, जय किसन वाडी, जळगाव, ता. जळगाव, जि. जळगाव- ४२५ ००१ **२. श्रीमती आशा रामभाऊ कांबळे** पत्ता - पदमालय रेस्ट हाऊस, जय किसन वाडी, जळगाव, ता. जळगाव, जि. जळगाव- ४२५ ००१ **तसेच राहणार** सर्व्हे नं. १४/१ + २१४ (२ए +२ बी), प्लॉट नं. १४१, उत्तरेकडील ब्लॉक नं. ए, हिरो हॉडा शोरुम मागे, साकेगाव, ता. भुसावळ, जि. जळगाव- ४२५ २०१ **जामीनदार -** **श्री. राहुल हरीभाऊ भारगवे** नंदी लोकधरा सी-४, रुम नं. २०२, नेतीवाली रोड, जनता बँक, कल्याण (पुर्व), काटेमनीवली ठाणे, महाराष्ट्र- ४२१ ३०६	रहिवाशी घर मालमत्ता ब्लॉक नं.ए, उत्तरेकडील बाजु, प्लॉट आणि बांधकाम असलेले अकृषीक प्लॉट नं. १४१, सर्व्हे नं. २१४ /१ +२१४ /२ए+२ बी, मौजे साकेगाव, ता. भुसावळ आणि जि. जळगाव. **मालकी हक्क - श्री. राजु रामभाऊ कांबळे आशा रामभाऊ कांबळे** **साईट एरिया - ६९.२५ स्क्वे.मी.** **बांधीव क्षेत्र एरिया - ९३.९० स्क्वे.मी.** **चतुःसिमा -** **पुर्व** - सर्व्हे नं. २२३, **पश्चिम** - रस्ता, **उत्तर** - प्लॉट नं. १४२, **दक्षिण** - ब्लॉक नं बी **प्रोप्रायटी आयडी -** **PUNB000828800128**	अ) ३१.०५.२०२१ ब) रु. २४,९२,८१३/- + इतर व्याज क) २०.०४.२०२२ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. १२.१३ लाख ब) रु. १.२१३ लाख (दि. ०७.०४.२०२६) क) रु. ०.२५ लाख	दि. ०७.०४.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, 07.04.2026 @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्त्याव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावार अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

दिनांक - २०.०३.२०२६
स्थळ - नाशिक
टीप : स्वैर भाषांतर: तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

स्वाक्षरी/-
श्री. वेंकटेश एस.
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, ई-२५, एमआयडीसी, वाळुंज, छत्रपती संभाजीनगर येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. लोकसत्ता **मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **छत्रपती संभाजीनगर कार्यालय :** १०३, गोमटेश मार्केट, न्यू गुलमंडी रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००१. दूरध्वनी :०२४०-२३४६३०३, **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, अँडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** * (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रूपये.